## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२८ ( प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात मराठी विभागातर्फे 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. सुप्रसिध्द चित्रकार राजू बाविस्कर यांची प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थिती होते.

मराठी साहित्यातील दिग्गज साहित्यिकांचे थोडक्यात परिचय देणारे साहित्यसृजन व भित्तिपत्रिका विद्यार्थ्यांकडून प्रशाळेत लावण्यात आल्या त्याचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी 'माझी मातृभाष गेली' ही छोटी नाटीका सादर केली. तर उपस्थित कृपा देसले व प्रफुल्ल कोठावदे या विद्यार्थ्यांनी त्यांच्या स्वरचित कविता सादर केल्या.

चित्रकार राजू बाविस्कर उद्घाटनप्रसंगी बोलतांना म्हणाले की भाषेमुळे आपलेपणा जाणवतो व भाषा ही माणसांना जोडण्याचे काम करते. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपाप्रसंगी प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.म.सु.पगारे यांनी महलाचा मुख्य दरवाजा हा आमच्या अस्तित्वाचा, अस्मितेचा, श्वासाचा म्हणजेच मराठीचा असावा. मराठी भाषेचा गौरव उत्कृष्ट साहित्य निर्मितीतून करता येईल असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन खेमराज पाटील व आभार प्रदर्शन भारती सोनवणे यांनी केले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.२८ ( प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस मधील प्रथम वर्ष २०२४-२५ मधील प्रवेशित मयत विद्यार्थिनी दीपाली महाजन हीचे मानवतेच्या दृष्टीकोनातून शैक्षणिक शुल्क माफ करुन धनादेश तिच्या पालकांना सुपूर्द करण्यात आला.

विद्यापीठातील स्कूल ऑफ केमिकल सायन्सेय मधील प्रथम वर्ष २०२४-२५ मधील प्रवेशित मयत विद्यार्थिनी दीपाली महाजन हिचे दि. १६ डिसेंबर २०२४ रोजी मु.पो. नगरदेवळा येथे निधन झाले. दिपाली महाजन हिने २३ जुलै २०२४ रोजी प्रथम वर्ष ॲनालिटीकल केमिस्ट्री या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला त्यावेळी १५ हजार ९१२ रूपये फी भरलेली होती. दीपाली महाजन या विद्यार्थिचे आकस्मिक निधन झाल्यामुळे तिने भरलेले १५ हजार ९१२ रुपयांचे शुल्क मानवतेच्या दृष्टीकोनात सहानूभूतीपुवर्क विचार करून परत करण्यात आले. व बाकी असले रु. १३ हजार १३३ रू शुल्क माफ करण्यात आले. विद्यापीठात भरलेला १५ हजार ९१२ रु. रकमेचा धनादेश कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते विद्यार्थिनीचे वडील भाऊराव महाजन यांना सुपुर्द करण्यात आला. यावेळी रसायनशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. दीपक दलाल उपस्थित होते.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि. २८ फेब्रूवारी, २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि. २८ फेब्रुवारी, २०२५

जळगाव दि.२८ ( प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील मराठी विभागाच्या वतीने बुधवार दि. ५ मार्च रोजी संशोधन प्रकल्प लेखन या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

बुधवारी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात या कार्यशाळेचे उद्घाटन होणर असून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी असतील. अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे प्रुख अतिथी आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील हिंदी विभागाचे माजी विभाग प्रमुख प्रा. व्ही.एन.भालेराव यांचे बीज भाषण होणार आहे. दुसऱ्या सत्रात संशोधन प्रकल्प लेखनाचे नियोजन यावर डॉ.भूपेंद्र केसूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या चर्चत डॉ. गणेश मोहिते, प्रा नितीन पाटील, डॉ. सतीष मस्के, डॉ.शशिकांत सोनवणे हे भाग घेतील. तिसऱ्या सत्रात सहभागी प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांचे निबंध वाचन होईल. प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली सायंकाळी ४.०० वाजता कार्यशाळेचा समारोप होणार आहे. शिक्षण सहसंचालक डॉ.कपील सिंघेल हे प्रमुख अतिथी राहतील अशी माहिती प्रशाळेचे संचालक प्रा. म.सु. पगारे व सन्मवय दीपक खरात यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनंसपर्क अधिकारी